महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
**१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१**

w'site : www.dydepune.com
e-mail : 11thonlineadmissiondydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया,
पुणे-२०१९-२०

# प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य-३
# अंतिम फेरीचे वेळापत्रक

(FCFS- First Come First Serve)-3.

**दि.२१.०९.२०१९**

इ. ११वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०३.२०१९ अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. त्यानुसार पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१९-२० साठी एकूण ०३ गुणवत्ता याद्या व एक विशेष फेरी व प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य-१ व २ अशा एकूण ०६ फे-या झालेल्या आहेत. अद्यापपर्यंत ९० टक्के पेक्षा जास्त प्रवेश पूर्ण झालेले आहेत, शासन निर्णय दि.०७.०३.२०१९ मधील तरतुदीनुसार प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य (FCFS- First Come First Serve)-3 या तत्त्वानुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्याकरिता वेळापत्रक व कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील. तसेच सदर प्रवेश फेरी ही अंतिम फेरी असणार आहे, याबाबत सर्व विद्यार्थ्यांना अवगत करण्याबाबत शासनाकडून सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य (FCFS- First Come First Serve)-3 या अंतिम फेरीमध्ये खालील प्रकारचे विद्यार्थी सहभागी होऊ शकतील.**

१) आतापर्यंत कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश न घेतलेले (Not Admitted)

२) यापुर्वी प्रवेश घेतला परंतु नंतर काही कारणास्तव प्रवेश रद्द केलेले विद्यार्थी (Cancelled)

३) अद्याप पर्यंत कोणत्याही फेरीमध्ये ॲलोकेशन न मिळालेले विद्यार्थी (Not Allotted)

४) प्रवेश नाकारलेले विद्यार्थी (Rejected)

५) मार्च-२०१९ व जूलै २०१९ च्या फेर परिक्षेत उत्तीर्ण विद्यार्थी व ATKT प्राप्त विद्यार्थी

६) नव्याने फॉर्म भरलेले विद्यार्थी (Fresh Registered)

(FCFS- First Come First Serve)-3 या तत्वाने प्रवेश करण्याकरिता गुणवत्तेनुसार पुढील प्रमाणे गट करुन दिलेल्या कार्यपध्दतीनुसार रिक्त जागा, गुणवत्तेचा गट व विद्यार्थ्यांने ऑनलाईन पध्दतीने नोंदविलेली वेळ यानुसार प्रथम ऑनलाईन क्लिक करणा-यास प्रथम प्रवेश (FCFS- First Come First Serve)-3 यानुसार या अंतिम फेरीतील विद्यार्थ्यांचे प्रवेश होतील.



Scanned by CamScanner

उर्वरित विद्यार्थ्यांचे एकूण दोन गटामध्ये विभाजन केले जाईल.

**१) गट क्र-१**

ज्या विद्यार्थ्यांना ३५ टक्के ते १०० टक्के गुण प्राप्त झालेले असतील असे सर्व विद्यार्थी या गटामध्ये सहभागी होऊ शकतील.

**२) गट क्र-२**

जे विद्यार्थी मार्च/जूलै २०१९ च्या इ.१० वी च्या परिक्षेत एटीकेटी (ATKT) प्राप्त विद्यार्थी तसेच गट क्र-१ मधील विद्यार्थी देखील या गटामध्ये सहभागी होऊ शकतील.

**उपरोक्त गटासाठी खालील प्रमाणे वेळापत्रक असेल.**

| अ.क्र. | दिनांक | वेळ | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | २३.०९.२०१९ | सकाळी १०.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत | ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश रद्द करावयाचा आहे, अशा विद्यार्थ्यांसाठी संबधित कनिष्ठ महाविद्यालयस्तरावर प्रवेश रद्द करण्याची सुविधा उपलब्ध असेल. |
| | **<u>महत्त्वाची सूचना :-</u> जे विद्यार्थी यापुर्वी घेतलेला प्रवेश रद्द करु इच्छित आहेत (वरील अ.क्र.१ मधील १ मध्ये नमूद) अशा विद्यार्थ्यांना FCFS-3 या अंतिम फेरी मध्ये उपलब्ध होणा-या रिक्त जागांमधूनच FCFS नुसारच प्रवेश घेता येईल. FCFS असल्यामुळे याक्षणी रिक्त दिसणारी जागा पुढच्या क्षणी भरली जावू शकते कारण एकाच वेळी इतर कोणता तरी विद्यार्थी त्याच जागेवर इतर ठिकाणाहून ऑनलाईन प्रवेश घेऊ शकतो, त्यामुळे प्रवेश रद्द केल्यास व तद्नंतर महाविद्यालयांची निवड करण्याची व प्रवेश घेण्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थी व पालकांची असेल, त्यामुळे विचारपुर्वकच प्रवेश रद्द करावा.** | | |
| २ | २३.०९.२०१९ ते २६.०९.२०१९ | सकाळी १०.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत | १) आतापर्यंत प्रवेश प्रक्रियेत सहभागी न झालेले विद्यार्थी तसेच ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज अपुर्ण आहेत<br>----------------------------<br>**अ) आतापर्यंत प्रवेश प्रक्रियेत सहभागी न झालेले विद्यार्थ्यांनी जवळच्या मार्गदर्शन केंद्रावरुन माहिती पुस्तिका प्राप्त करुन घ्यावी. तद्नंतर माहिती पुस्तिकेत दिलेल्या सूचनेनुसार प्रवेश अर्ज भरावा. (राज्य मंडळाच्या जुलै २०१९ परिक्षेमध्ये उत्तीर्ण झालेले विद्यार्थी आणि राज्य मंडळाच्या मार्च/जुलै २०१९ परिक्षेमध्ये उत्तीर्ण झालेले विद्यार्थी आणि राज्य मंडळाच्या मार्च जुलै २०१९ परिक्षेमध्ये एटीकेटी (नवीन अर्ज करणे, अपुर्ण अर्ज ॲप्रुव्ह करणे..**<br>**i) ज्या इ.१०वी उत्तीर्ण/एटीकेटी विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत ऑनलाईन अर्जच केला नाही अशा विद्यार्थ्यांनी नवीन माहिती पुस्तिका घेऊन लॉगइन आयडी व पासवर्ड च्या सहांय्याने ऑनलाईन अर्ज भाग-१ पुर्ण करुन मार्गदर्शन केंद्राकडून भाग-१ ॲप्रुव्ह करुन घेणे.**<br>**ii) अपुर्ण अर्ज पुर्ण करणे....ज्या विद्यार्थ्यांनी यापुर्वी अर्ज केला आहे परंतु भाग-१ मध्ये Pending status असेल अशा विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केंद्राकडून भाग-१ ॲप्रुव्ह करुन घेणे.** |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | २३.०९.२०१९ ते २६.०९.२०१९ | २३.०९.२०१९ सकाळी १०.०० वा ते २६.०९.२०१९ सायं.५.०० वाजेपर्यंत | **कोटा अंतर्गत जागा प्रत्यार्प्रित करणे**<br>--- उच्च माध्यमिक अथवा कनिष्ठ महाविद्यालयांनी स्वेच्छेने जागा प्रत्यार्प्रित करणे व प्रवेश अपडेट करणे.<br>--- ज्या संस्थेतर्फे संचलित महाविद्यालयांना त्यांच्याकडील कोटयातील जागा (इनहाऊस/व्यवस्थापन/अल्पसंख्यांक) प्रत्यार्प्रित (Surrender) करावयाच्या आहेत, त्यांनी स्व इच्छिने ) त्या रिक्त जागा प्रत्यार्प्रित (Surrender) कराव्यात. |
| ४ | २६.०९.२०१९ | सायं. ६.०० वा | प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य (FCFS- First Come First Serve)-3 **गट क्र-१** साठी रिक्त जागांचा तपशिल जाहिर करणे. |
| ५ | २७.०९.२०१९ | सकाळी १०.०० ते ५.०० | गट क्र-१ (३५ ते १०० टक्के) :- मधील विद्यार्थ्यांनी दिलेल्या कार्यपध्दतीनुसार ऑनलाईन पध्दतीने आपला प्रवेश निश्चित करावा. (ॲलोकेशन करुन घ्यावे व त्याची प्रिंट घेऊन त्याचदिवशी किंवा दिलेल्या मुदतीत प्रत्यक्ष कॉलेजमध्ये जाऊन मुळ कागदपत्रे सादर करुन व फी भरुन आपला प्रवेश अंतिम करावा). |
| ६ | २७.०९.२०१९ ते २८.०९.२०१९ | सकाळी १०.०० ते ३.०० वाजेपर्यंत | ॲलोकेशन झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी त्याच दिवशी प्रत्यक्ष कॉलेजमध्ये जाऊन आपला प्रवेश ऑनलाईन प्रवेशाची पावती **(CGR-Computrized Genreted Recipt)** घेऊन निश्चित करतील. |
| ७ | २८.०९.२०१९ | सायं. ७.०० वा. | **गट क्र-२** साठी रिक्त जागांचा तपशिल जाहिर करणे. |
| ८ | ३०.०९.२०१९ | सकाळी १०.०० ते ५.०० वाजता | **गट क्र-२** जे विद्यार्थी मार्च/जूलै २०१८ च्या इ.१० वी च्या परिक्षेत एटीकेटी (ATKT) प्राप्त विद्यार्थ्यांनी तसेच गट क्र-१ मधील विद्यार्थ्यांनी या गटामध्ये दिलेल्या कार्यपध्दतीनुसार ऑनलाईन पध्दतीने आपला प्रवेश निश्चित करावा. (ॲलोकेशन करुन घ्यावे व त्याची प्रिंट घेऊन त्याचदिवशी किंवा दिलेल्या मुदतीत प्रत्यक्ष कॉलेजमध्ये जाऊन मुळ कागदपत्रे सादर करुन व फी भरुन आपला प्रवेश अंतिम करावा). |
| ९ | ३०.०९.२०१९ व ०१.१०.२०१९ | सकाळी १०.०० ते ५.०० वाजेपर्यंत | ॲलोकेशन झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी त्याच दिवशी प्रत्यक्ष कॉलेजमध्ये जाऊन आपला प्रवेश ऑनलाईन प्रवेशाची पावती **(CGR- Computrized Genreted Recipt)** घेऊन निश्चित करतील. |
| १० | १०.१०.२०१९ | सायं. ७.०० वा. | रिक्त जागा संकेतस्थळावर जाहीर करणे |

**<u>सूचना:-</u> पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांनी उशिरा प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांसाठी जादा तासिका/प्रत्याक्षिक चे आयोजन करुन अभ्यासक्रम पुर्ण करुन घ्यावा.**

**प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य-३ या अंतिम फेरीची कार्यपध्दती:-**

१. विद्यार्थ्यांने इ.११ वी ऑनलाईन प्रवेशाच्या http://pune.11thadmission.net या संकेतस्थळावर जाऊन आपल्याकडील युजर-आयडी व पासवर्ड चा वापर करुन Student Login करावे.

२. Student Login केल्यानंतर भाग-२ मधील चारही शाखा असणारी स्क्रिन दिसेल , त्यापैकी आपणांस हवी असणारी शाखा व माध्यम निवडावे व या स्क्रिनवर असणा-या सबमिट बटनावर क्लिक करावे.

३. यानंतर कॉलेज कोड समोर त्या दिवशी रिक्त असणा-या जागांचा तपशिल दिसेल. व त्या समोरच विद्यार्थ्यांसाठी Apply Now हे बटन दिसेल व त्यावर क्लिक करुन आपणांस हवे असलेले महाविद्यालय विद्यार्थी निवडतील.



Scanned by CamScanner

४. विद्यार्थ्यांनी निवडलेल्या शाखेची कनिष्ठ महाविद्यालय त्यांच्या यु-डायस क्रमांक, कॉलेज कोड, कॉलेजचे नांव, अनुदानित, विना अनुदानित, कायमविना अनुदानित, स्वयंअर्थसाहय्यित हे प्रकार निवडण्यासाठी फील्टरची सोय केलेली असेल.

५. जर त्या कॉलेजमध्ये जागा रिक्त असेल व विद्यार्थ्यांने Apply Now या बटनावर क्लिक केले व त्यावेळेस ती जागा विद्यार्थ्यास मिळाली तर सदर कॉलेजसाठी संगणक पावती (CGR- Computrized Genreted Slip) उपलब्ध होईल व त्याबाबतचा मेसेज स्क्रिनवर दिसेल व संबधित विद्यार्थ्यास कॉलेज मिळालेबाबत अभिनंदनाचा संदेश मिळेल व त्याची प्रिन्ट विद्यार्थ्यांने घ्याव व विद्यार्थी त्याच दिवशी संबधित महाविद्यालयात जाऊन प्रवेश घेऊ शकतो . संबधित महाविद्यालयामध्ये सध्द्ा ॲडमिशन पावती (CGR- Computrized Genreted Slip) घेऊनच आपला प्रवेश दिलेल्या वेळेत निश्चित करावा.

६. Apply Now या बटनावर एकाच वेळेस अनेक विद्यार्थी क्लिक करत असतील त्यामुळे जागा उपलब्ध असेपर्यंत लवकरात लवकर जे विद्यार्थी Apply Now वर क्लिक करतील अशाच विद्यार्थ्यांना त्याठिकाणी प्रवेश मिळाल्याचा संदेश मिळेल. ज्या विद्यार्थ्यांना जागा उपलब्ध नाही असा संदेश प्राप्त होईल त्या विद्यार्थ्यांनी वरील प्रमाणेच नवीन महाविद्यालये निवडून आपली संगणक पावती (CGR- Computrized Genreted Slip)घेऊन उपलब्ध महाविद्यालयातील रिक्त जागेवर प्रवेश घ्यावा.

७.विद्यार्थ्यांने दोन गटामध्ये वरील प्रमाणे दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे दिलेल्या वेळेत प्रवेश निश्चित करावा.

**८. या कार्यपध्दतीचा व्हिडीओ प्रवेशाच्या संकेतस्थळावरील होमपेजवर उपलब्ध आहे.**

**९. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य <u>(FCFS- First Come First Serve)-3</u> या अंतिम फेरी असल्यामुळे विद्यार्थ्यांनी सदर फेरीमध्ये प्रवेश घ्यावा त्यानंतर कोणतीही प्रवेश फेरी आयोजित केली जाणार नाही याची सर्व विद्यार्थी / पालक यांनी नोंद घ्यावी.**

सदरचे प्रसिध्दीनिवदेन या कार्यालयाच्या **www.dydepune.com** व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या **http://pune.11thadmission.net** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(प्रविण अहिरे)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
शक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

Scanned by CamScanner